
## थोडक्यात



### हुतात्मा राजगुरू यांना ११७ व्या जयंतीनिमित्त अभिवादन

● जयंतीनिमित्त राजगुरूनगर शहरात विविध कार्यक्रम

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांना ११७ व्या जयंती निमित्त राजगुरुनगर शहरात तसेच एसटी बसस्थानकावरील हुतात्मा राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांच्या स्मृतीशिल्पांना मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. येथील एसटी बसस्थानकातील स्मृती शिल्पांना हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, महात्मा गांधी विद्यालय तसेच फुलगाव आपटी (ता.हवेली ) येथील नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिक स्कूल विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. शिरूर लोकसभेचे माजी खासदार व म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा अॅड राजमाला बुट्टे पाटील, राजगुरूनगर बँकेचे माजी अध्यक्ष गणेश थिगळे, संचालक बाळासाहेब सांडभोर, अॅड. गणेश सांडभोर, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिरीष पिंगळे, डॉ. एच एम जरे, महात्मा गांधी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संध्या कांबळे यावेळी उपस्थित होते. हुतात्मा राजगुरु प्रतिष्ठानचे अध्यक्ष कोंडीभाऊ टाकळकर, अॅड. मुकुंद आवटे, अशोक दुगड यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. गायक देविदास बोऱ्हाडे व सहकाऱ्यांनी देशभक्तीपर गीत गायन केले.सुदाम कराळे यांनी सुत्रसंचालन केले. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, खेड बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांनी स्मृती शिल्पांना पुष्पहार अर्पण केले.



### कैलास पाचारणे राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्काराने सन्मानित

● प्रशासकीय व शैक्षणिक कार्याबद्दल सन्मान

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील सामाजीक कार्यकर्ते कैलास पाचारणे यांना राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पाचारणे हे येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रबंधक व खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापकीय अधिकारी आहेत. आविष्कार सोशल अँड एज्युकेशनल फौंडेशनच्या, पुणे जिल्हा शाखेच्या वतीने शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल प्रत्येक वर्षी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान केले जातात. या संस्थेकडून यावर्षी पाचारणे यांना सन्मानित करण्यात आले. कोरेगाव पार्क पुणे येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद मेमोरीयल हॉलमध्ये हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. भारतीय प्रशासकीय सेवेतील (आय.ए.एस.) निवृत्त अधिकारी व यशदा संस्थेचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे राष्ट्रीय व संस्थापक अध्यक्ष संजय पवार, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. संतोष भोसले, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रकाश चौधरी, पुणे शहराध्यक्ष प्रा.श्रीकांत जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. खेड तालुक्यातील पाचारणेवाडी हे मूळ गाव असलेले कैलास पाचारणे यांचा जन्म कष्टकरी शेतकरी कुटुंबात झाला. तिन्हेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालय येथे पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण येथून पूर्ण केले. याशिवाय टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून ग्रंथालय व्यवस्थापन पदविका, महात्मा फुले कृषी विद्यापीठातून ग्रीन हाऊस पदविका, डिप्लोमा इन कॉम्प्युटर मॅनेजमेंट असे अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केले. कला वाणिज्य महाविद्यालय, चाकण येथे सेवकपदावर सेवेस सुरुवात केली. सेवक, ग्रंथालय परिचय, ग्रंथालय लिपिक, कनिष्ठ लिपीक,मुख्य लिपिक या पदांवर पदोन्नती घेऊन येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रबंधक पदाची त्यांनी जबाबदारी स्वीकारली.

# ब्रिजच्या उद्घाटनासाठी मनसेचा गनिमी कावा

## सिंहगड रोड ब्रिजच्या उद्घाटनासाठी मनसेचा पुढाकार; अनेक मनसैनिक ताब्यात



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोडवरील नवीन पूल नागरिकांसाठी तात्काळ खुला करावा, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आज आंदोलन छेडले. या आंदोलनात मनसे शहराध्यक्ष साईनाथ बाबर, युवानेते मयुरेश वांजळे, शिवाजी मते यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

मागील आठवड्यातच मनसेकडून पुणे महानगरपालिकेला पुलाचे उद्घाटन करून वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी पत्राद्वारे करण्यात आली होती. मात्र प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने आज मनसैनिक मोठ्या संख्येने एकत्र आले. शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांच्या नेतृत्वाखाली पूल उद्घाटनासाठी पूजा करून बॅरिकेड्स हटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करून आंदोलन थांबवले.

परिसरात सकाळपासूनच मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तरीही मनसैनिकांनी नागरिकांच्या सेवेसाठी पूल उघडण्याचा प्रयत्न केला. "केवळ मान्यवरांच्या सोयीसाठी पूल बंद ठेवणे हा नागरिकांवरील अन्याय आहे. वाहतूककोंडीमुळे सर्वसामान्यांचा छळ होत आहे. हा अन्याय मनसे कदापिही सहन करणार नाही," असे साईनाथ बाबर यांनी स्पष्ट केले.

युवानेते मयुरेश वांजळे यांनी प्रशासनावर कठोर शब्दात टीका केली. "सिंहगड रोड परिसरातील नागरिकांना दररोज प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांवर होणारा हा अन्याय मनसे थांबवणार," असे ते म्हणाले.

शिवाजीराव मते यांनी "हे आंदोलन पोलिसांच्या मदतीने दडपण्याचा प्रयत्न झाला, मात्र भविष्यात गनिमी कावा करून हा पूल नागरिकांच्या सेवेत देऊ," असा इशारा दिला.

खडकवासला विधानसभा अध्यक्ष विजय मते यांनीही सत्ताधाऱ्यांवर टीका करत "मनसेला श्रेय मिळू नये म्हणून पोलिसांमार्फत दडपशाही सुरू आहे," असा आरोप केला. मनसे नेत्या सोनाली पोकळे यांनीही शासनाविरोधात नाराजी व्यक्त केली.

यावेळी महाराष्ट्र सैनिक व पोलिसांमध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर मनसे नेत्यांना ताब्यात घेऊन काही वेळातच सोडण्यात आले. या सर्व आंदोलनामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

शहराध्यक्ष साईनाथ बाबर, मयुरेश वांजळे, विजय मते, शिवाजीराव मते, अॅड. सुनील घोरपडे, रमेश करंजावणे, अतुल शेळीमकर, शांता कोकरे, बाळासाहेब मंडलिक, सिद्धार्थ पोकळे, प्रशांत पवार, निलेश जोरी, आकाश साळुंखे, हर्षल रायकर, नयन धोत्रे राहुल वाळुंजकर, स्वप्निल नांगरे, सूर्यकांत कोरे, बाळासाहेब हनमघर, गणेश धुमाळ, परवेज शेख, अभिजीत भिसे, शुभम जगदाळे, सचिन लाटे, राजाभाऊ निवगुणे, नितीन भांडवलकर, सागर पाटील आदींसह मोठ्या संख्येने मनसैनिक उपस्थित होते.

नागरिकांसाठी मनसेने उचललेले हे पाऊल सध्या चर्चेचा विषय ठरले आहे.

### पुणे महापालिका २०२५

## भाजप स्वबळावर लढणार

**मा. श्री. प्रतिक गंगणे - व्यवस्थापकीय संपादक**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी पुणे महानगरपालिका निवडणूक भारतीय जनता पक्षाने स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील बहुतांश ठिकाणी महायुती म्हणून निवडणुका लढवणार असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र पुणे महानगरपालिका निवडणूक ही त्याला अपवाद ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पुण्यात गेल्या काही वर्षांत भाजपाने मजबूत संघटन उभे केले असून, कार्यकर्त्यांची मोठी फळी तयार केली आहे. त्यामुळे पक्ष स्थानिक पातळीवर स्वतंत्रपणे निवडणुकीस सामोरे जाण्याचा विचार करत आहे. महापालिकेत पुन्हा एकदा सत्ता मिळवण्यासाठी पक्षांतर्गत जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.

दरम्यान, पक्षांतर्गत स्पर्धेचेही चित्र समोर येत आहे. अनेक विद्यमान नगरसेवकांसह नव्या चेहऱ्यांनीही तिकीटासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. त्यामुळे भाजपाच्या उमेदवारी निवडीतील प्रक्रिया अधिक काटेकोर होणार असून, काही नगरसेवकांना कठीण स्पर्धेला सामोरे जावे लागणार आहे.

राज्यात महायुती कायम असली तरी पुण्यातील भाजपाचे स्थानिक नेते, कार्यकर्ते व पदाधिकारी स्वबळावर विजय मिळवण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. पुढील काही आठवड्यांत अंतिम प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर भाजपाच्या रणनितीला अधिक वेग येणार आहे.

# मराठा बांधवांना नागेश चव्हाण यांची साद

## मुंबई आंदोलनासाठी सोलापूर जिल्ह्यातून समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन






**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

मुंबईत लवकरच सुरू होणाऱ्या मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या आंदोलनात सोलापूर जिल्ह्यातील मराठा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा सेवक, छावा संघटनेचे राज्य सचिव नागेश चव्हाण यांनी केले आहे.

नागेश चव्हाण म्हणाले की, "हे आंदोलन कोणत्याही वैयक्तिक स्वार्थासाठी नसून फक्त मराठा समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी आहे. मनोज दादा जरांगे पाटील समाजाच्या हक्कांसाठी झगडत आहेत. त्यामुळे जात, धर्म, पक्ष यांचे भेद विसरून सर्वांनी ठामपणे त्यांच्या मागे उभे राहावे."

या आंदोलनासाठी सोलापूर जिल्ह्यातून जाणाऱ्या बांधवांसाठी १० हजार भाकरी व शेंगदाणा चटणी वाटप करण्याची घोषणा नागेश चव्हाण यांनी केली आहे. आंदोलनात येणाऱ्यांना कोणताही अडथळा जाणवू नये, यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपली जबाबदारी ओळखून सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

चव्हाण पुढे म्हणाले की, "महाराष्ट्राच्या भविष्यासाठी ही लढाई निर्णायक आहे. आज आपण एकत्र आलो नाही तर उद्या आपल्या पिढ्यांना मोठा फटका बसू शकतो. त्यामुळे प्रगतशील समाजबांधवांनीही आपल्या परीने शक्य तेवढी मदत करावी." मराठा संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या या चळवळीला आपण सर्वांनी पाठिंबा द्यावा अशी विनंती ही श्री चव्हाण यांनी यावेळी बोलताना केली.

मुंबईतील या आंदोलनाची चर्चा सध्या संपूर्ण राज्यभर होत असून, ठिकठिकाणाहून मराठा समाज मोठ्या संख्येने सहभागी होण्यासाठी सज्ज होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावांतून खासगी बस, चारचाकी तसेच दुचाकी वाहनांमधून हजारो बांधव मुंबईकडे निघणार असल्याची माहिती मिळत आहे.

या आंदोलनामुळे पुन्हा एकदा मराठा समाजाची एकजूट आणि ताकद महाराष्ट्राला दिसणार आहे. समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी होणाऱ्या या निर्णायक लढ्यात प्रत्येक मराठा बांधवाने ठामपणे सहभाग नोंदवावा, असे आवाहन मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. त्यामुळे मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात मराठा बांधव उपस्थित राहणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## आ. भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक जाणीव

### रक्तगट तपासणी शिबिरांच्या माध्यमातून सप्ताहाची सुरुवात



**वारजे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या वर्षी वाढदिवस सप्ताहाची सुरुवात एका महत्त्वाच्या पण आजवर दुर्लक्षित राहिलेल्या सामाजिक प्रश्नावर करण्यात आली आहे.

साधारणपणे विविध आरोग्य शिबिरे होत असतात, मात्र रक्तगट तपासणीची सुविधा अनेकदा विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेर जाते. या तपासणीसाठी प्रत्येकी ५० रुपये खर्च येतो, त्यामुळे पुणे मनपा शाळांमधील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी वंचित राहतात. याची जाणीव ठेवून वारजे–शिवणे परिसरातील सुमारे ६ हजार विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी पूर्णपणे मोफत करण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम पुढील ९ दिवस राबविण्यात येणार आहे.

सप्ताहाचा शुभारंभ कै. शामराव बराटे विद्यालय (दिगंबर वाडी) येथे विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करून करण्यात आला.

या उपक्रमाचे उद्घाटन पुणे महानगरपालिकेचे मा. नगरसेवक किरण भाऊ बारटक्के यांच्या हस्ते झाले. यावेळी खडकवासला मतदारसंघ भाजपा सरचिटणीस चेतन गोंडाळ, श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष परशुराम यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

## ७० कोटींचा निधी मंजूर करुन, पूलांचे बांधकाम केले पुर्ण

● "शब्द नव्हे, वचनपूर्ती" – आमदार शेखर निकम

**चिपळूण (दै. आरंभ पर्व)**

चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार शेखर निकम यांनी २०१९ आपल्या कार्यकाळात विकासकामांना नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिलं आहे. त्यांच्या प्रयत्नातून चिपळूण तालुक्यातील ३५ धोकादायक व जीर्ण पुलांची पुनर्बांधणी यशस्वीरित्या पूर्ण झाली असून, सुमारे रू.७० कोटींचा निधी राज्य शासन व नाबार्डच्या माध्यमातून मंजूर करून हे काम वेळेत पूर्ण करण्यात आले. मात्र, २३ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री १०.३० वाजता पिंपळी-नांदिवसे रस्त्यावर प्रजिमा २३ अंतर्गत येणारा पिंपळी पूल (मोठा पूल, कि.मी. 1/00) कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली.

हा पूल अनेक वर्षांपासून जुनाट अवस्थेत होता, आमदार शेखर निकम यांनी २०२२ पासून याच्या पुनर्बांधणीसाठी रत्नगिरी जिल्ह्याचे पालकमंत्री व उद्योगमंत्री मा. श्री. उदयजी सामंत यांच्या माध्यमातून पाठपुरावा केला व त्यांचे माध्यमातून निधी मंजूर झाला आहे. त्यांचे चिपळूण जनतेच्या वतीने आमदार शेखर निकम यांनी आभार मानले आहेत.

# लढायचे आहे पण कोठून लढू !

**मा. श्री. लक्ष्मण साबळे**
**मो.बा. : 8605284272**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिका निवडणूक 2025 : प्रभाग रचनेवरून सर्वपक्षीय नेते मंडळींमध्ये संभ्रम

आगामी पुणे महानगरपालिका निवडणूक 2025 च्या पार्श्वभूमीवर नुकतीच जाहीर झालेली प्रारूप प्रभाग रचना ही राजकीय वर्तुळात मोठी चर्चेचा विषय ठरली आहे. नवीन रचनेनुसार अनेक भागांची विभागणी बदलली असून, काही प्रभागांचे आरक्षण बदलल्यामुळे सर्वपक्षीय नेत्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कोणत्या प्रभागातून लढायचे, तिकीट कुठून मागायचे आणि संघटनात्मक आखणी कशी करायची, यावर सध्या सर्वच पक्षांत गोंधळ उडाल्याचे चित्र आहे. काही लोकप्रिय नगरसेवकांचा प्रभागच वेगळ्या क्षेत्रात गेला आहे, तर काही ठिकाणी नव्या आकडेवारीनुसार आरक्षण बदलल्याने महिला, ओबीसी, अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव झालेल्या जागांवर नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.

भाजप, शिवसेना , शिवसेना(उबाठा),काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार व अजित पवार गट), मनसे यांच्यासह सर्वच पक्ष या नव्या प्रभाग रचनेचा बारकाईने अभ्यास करत आहेत. मतदारसंघांच्या नव्या सीमांकनानंतर कार्यकर्त्यांमध्येही अस्वस्थता निर्माण झाली आहे. "जिथे गेली अनेक वर्षं सेवा केली, तो भाग आता वेगळ्या प्रभागात गेला" अशी नाराजी अनेक ठिकाणी व्यक्त होत आहे.

महानगरपालिकेची निवडणूक आता अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षाचे नेते व इच्छुक उमेदवार यांच्यासाठी पुढील काही दिवस निर्णायक ठरणार आहेत. अंतिम प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतरच खऱ्या अर्थाने राजकीय समीकरणे स्पष्ट होतील.

अनेक प्रभागांमध्ये हरकतींचा पाऊस पडत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे या हरकती नंतर सुनावणी होऊन अंतिम प्रभाग रचनेमध्ये काय बदल होतो का याकडे सर्वांचे लक्ष आहे.

इच्छुक उमेदवारांनी गेल्या अनेक वर्षापासून भागांमध्ये विविध कार्यक्रम व उपक्रम राबवले होते. त्यामुळे त्या प्रभागामध्ये केलेले कामे व मतदारांशी असलेला जनसंपर्क यामुळे महानगरपालिका निवडणुकीमध्ये जनतेकडून त्यांना अपेक्षा होती.

मात्र पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग रचनांमध्ये बहुतांश इच्छुक उमेदवारांकडून नाराजी सुर उमटत आहे.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.